।। सा विद्या या विमुक्तये ।।

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

25 1994 - 2019 SILVER JUBILEE YEAR


# ACADEMIC (1-BOARD OF STUDIES) SECTION


**Phone: (02462) 229542**
**Fax : (02462) 229574**
**Website: www.srtmun.ac.in** **E-mail: bos.srtmun@gmail.com**


**शैक्षणिक वर्ष २०१९–२० करिता अभियांत्रिकी तृतीय वर्षातील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना नवीन अभ्यासक्रमातील बदलामुळे व डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नीकल युनिव्हर्सिटी, लोणेरे (बाटू) कडे स्थलांतरित झाल्यामुळे अंतिम वर्षात केवळ शैक्षणिक सत्र पूर्ण करण्यासाठी तात्पुरता प्रवेश देण्याबाबत.**

## प रि प त्र क

या परिपत्रकान्वये सर्व संलग्नित अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या प्राचार्यांना कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठातील अनेक महाविद्यालये डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नीकल युनीव्हर्सिटी, लोणेरे (बाटू) कडे संलग्नित झालेली आहेत. त्या विद्यापीठाकडे संलग्नित झालेल्या महाविद्यालयांच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रम व परीक्षा या विद्यापीठामार्फत होत आहेत. त्यामुळे शैक्षणिक वर्ष २०१९–२० हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नीकल युनीव्हर्सिटी, लोणेरे (बाटू) मध्ये वर्ग झालेल्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांचे हे शवेटचे वर्ष आहे. त्यामुळे मागील वर्षापर्यंत तृतीय वर्षात अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना शैक्षणिक सत्र पूर्ण करण्यासाठी अंतिम वर्षात तात्पुरता प्रवेश देण्याचा निर्णय झालेला आहे. त्याची नियमावली खालीलप्रमाणे आहे.

१) अभियांत्रिकी तृतीय वर्षातील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना नवीन अभ्यासक्रमातील बदलामुळे व डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नीकल युनिव्हर्सिटी, लोणेरे (बाटू) कडे स्थलांतरित झाल्यामुळे अंतिम वर्षात केवळ शैक्षणिक सत्र पूर्ण करण्यासाठी तात्पुरता प्रवेश देण्यात यावा.

२) सदरील अंतिम वर्षात दिलेला प्रवेश हा तात्पुरत्या स्वरूपात असेल. हिवाळी २०१९ मध्ये होऊ घातलेल्या परीक्षेमध्ये द्वितीय वर्ष पूर्णत: उत्तीर्ण असल्याशिवाय व तृतीय वर्षात उत्तीर्ण किंवा किमान ए.टी.के.टी. असल्याशिवाय सदर विद्यार्थ्यास आंतिम वर्षास दिलेला तात्पुरता प्रवेश नियमित होणार नाही.

३) समाजकल्याण विभागाकडून मिळण्याऱ्या शिष्यवृत्ती संदर्भात विद्यापीठाची जबाबदारी राहणार नाही. ती सर्व जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यांची असेल, असे हमीपत्र संबंधित विद्यार्थी व त्यांच्या पालकांकडून घेण्यात यावे.

सदरील परिपत्रक प्रस्तुत विद्यापीठाच्या **www.srtmun.ac.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तरी सदरील बाब ही सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावी.

'ज्ञानतीर्थ' परिसर,
विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६.
**जा.क्र.:** शैक्षणिक–१/परिपत्रक/अभियांत्रिकी/तात्पुरता प्रवेश/२०१९–२०/९८५
**दिनांक :** १६.०८.२०१९.

स्वाक्षरित/–
**उपकुलसचिव**
शैक्षणिक (१–अभ्यासमंडळ) विभाग

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस्तव :

१) मा. कुलसचिव यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा. प्राचार्य, सर्व संबंधित संलग्नित अभियांत्रिकी महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
४) साहाय्यक कुलसचिव, पदव्युत्तर विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
५) उपकुलसचिव, पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
६) सिस्टम एक्सपर्ट, शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.